THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

TUESDAY, 17TH SEPTEMBER 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्यासाठींच्या आक्टाच्या मसुद्यावरील, मुंबईचे नामदार गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या कौन्सिलाच्या सिलेक्ट कमिटीचा खालीं दिलेला रिपोर्ट, आणि सदहू सिलेक्ट कमिटीनें सुधारला आहे त्याप्रमाणें तो मसुदा, हे, हिंदुस्थान सरकारची मंजूरी पुढें मिळेल अशा समजुतीनें, कौन्सिलच्या सभांमध्यें काम चालविण्याबाबदच्या कनूंपैकीं २९ व्या कानूअन्वयें सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केले आहेत.**

**सन १८९५ चा आक्टाचा मसुदा नंबर २, ह्मणजे, सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्यासाठींचा आक्टाचा मसुदा, याचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट.**

आह्मीं, सन १८९५ चा आक्टाचा मसुदा नंबर २, ह्मणजे सन १८६९ चा मुंबईचे सिव्हिल कोर्टांचा आक्ट सुधारण्यासाठींचा आक्टाचा मसुदा, याचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या सिलेक्ट कमिटीचे मेंबर, यांनीं सदहू मसुद्यांतील ठरावांचा विचार केला आहे.

२. आह्मांस सदहू मसुद्याचें धोरण मान्य आहे, परंतु २ऱ्या कलमांत "जो कोणी मनुष्य" या शब्दांनंतर "राणी सरकारचा" या शब्दांऐवजीं "मलिका माआझमांचा रैयत" हे शब्द दाखल करावे अशी आह्मी शिफारस करतों.

३. आह्मी आणखी अशी शिफारस करतों कीं ज्या बाबतींत सरकारी अमलदारास सन १८४१च्या १९ व्या आक्टाअन्वयें किंवा सन १८५८ च्या ३५ व्या आक्टाअन्वयें मिळकतीचें संरक्षण करण्यास, किंवा मालमिळकतीचा व्यवस्थापक, नेमला असेल त्या बाबतींस ३ ऱ्या कलमांतील ठराव लागू करावे, व या कारणासाठीं आह्मी अशी शिफारस करतों कीं कलम ३ (ब) (१) यांत आरंभीं ह्मणजे "दिवाणी काम" या शब्दांच्या पूर्वी "कोर्टाच्या ज्या अमलदारास" हे शब्द, व "नेमलेला कोर्टाचा एकादा" या शब्दांच्या ऐवजीं "नेमलें असेल तो" हे शब्द दाखल करावे, आणि कलम ३ (ब) (२) यांत आरंभीं ह्मणजे "सन १८९० चा" या शब्दांच्या पूर्वीं "ज्या सरकारी अमलदारास, सन १८४१ च्या १९ व्या आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें, मिळकतीचें संरक्षण करण्यास नेमलें असेल, किंवा सन १८५८ च्या ३५ व्या आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें एकाद्या वेड्या [मनुष्या-]च्या मालमिळकतीचा व्यवस्थापक नेमला असेल, किंवा" हे शब्द दाखल करावे, व "त्याच्या हुद्याचे नात्यानें" या शब्दांच्या पूर्वील "ज्या सरकारी अमलदारास "हे शब्द गाळावे. याप्रमाणें सुधारणूक करण्यास सन १८९२ चा हिंदुस्थानचा कौन्सिलांबाबद आक्ट याच्या ९ व्या कलमाअन्वयें हिंदुस्थान सरकारची मंजुरी लागेल असें आह्मांस वाटतें. कारण ती सुधारणूक केल्यानें, सन १८९२ चा कौन्सिलांबाबद आक्ट ठरण्यापूर्वीं हिंदुस्थान सर-

कारानें सन १८६९ च्या १४ व्या आक्टाच्या मागाहून केलेल्या कायद्यांवरून सुधारलेला सदहू सन १८६९ चा १४ वा आक्ट हा, हिंदुस्थान सरकारनें विद्यमान मसुदा दाखल करण्यास मंजुरी दिली त्यावेळीं ज्या रीतीनें धारण्याचा हेतु नव्हता त्या रीतीनें सुधारल्यासारखा होईल. जरूर असलेली मंजुरी मिळाल्यावर, सदहू मसुदा हल्लीं सुधारला आहे त्याप्रमाणें तो पसार करावा अशी आह्मी शिफारस करितों.

४. सदहू मसुदा दाखल करण्यांत आला त्याप्रमाणें त्याचा गुजराथी, मराठी व कानडी भाषांमध्यें तर्जुमा केला असून तो मुंबईच्या सरकारी ग्याझेटांत तारीख १ ली आगस्ट सन १८९१ रोजीं प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें त्याचा सिंधी भाषेंत तर्जुमा करून तो त्याच तारखेस सिंधच्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध करण्यांत आला. तसाच, हिंदुस्थान सरकारची मंजूरी मिळाल्यावर, सदहू मसुदा आतां सुधारला आहे त्याप्रमाणें त्याचा तर्जुमा करून तो प्रसिद्ध करावा असें आह्मी फर्माविलें आहे.

(सही) एच्. बर्डवुड.
" जॉन् म्याक्फर्सन.
" फेरोजशा मे. मेथा.
" चिमणलाल ह. सेटलवाड.
" दाजी आबाजी खरे.

मुक्काम पुणें, तारीख ४ थी सेप्टेंबर, सन १८९१.

---

## सन १८९५ चा आक्टाचा मसुदा नंबर २.

### सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

(सिलेक्ट कमिटीनें तारीख ७ माहे आगस्ट सन १८९१ रोजीं सुधारला आहे त्याप्रमाणें.)

ज्या अर्थीं सन १८७६ व सन १८८० च्या मुंबईच्या रेव्हेन्यु हुकुमतीच्या आक्टांवरून आणि सन १८९१ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट यावरून सुधारलेला सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारणें योग्य आहे, आणि ज्या अर्थीं सन १८९२ चा हिंदुस्तानचा कौन्सिलांबाबद आक्ट याच्या ५ व्या कलमावरून फर्माविल्याप्रमाणें आली जनाब गव्हर्नर जनरल यांची हा आक्ट पास करण्यासाठीं पूर्वी मंजूरी मिळविलेली आहे, त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे :—

लहान सरनामा. १. या आक्टास "सन १८९१ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट" असें ह्मणावें.

कलम २२ याची सुधारणूक. २. वर सांगितल्याप्रमाणें सुधारलेला सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट याच्या २२ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत "कोणी मनुष्य राणी सरकारचा रैयत असून त्याणें" या शब्दांच्या ऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे :

"जो कोणी मनुष्य मलिका माआझमांचा रयैत किंवा मलिका माआझमांच्या सार्वभौम सत्तेखालीं असणाऱ्या हिंदुस्तानांतील एकाद्या देशी राजाचा अथवा संस्थानाचा रैयत नसेल व शिवाय ज्याणें".

कलम ३२ याची सुधारणूक. ३. वर सांगितल्याप्रमाणें सुधारलेल्या सदहू आक्टाच्या ३२ व्या कलमाच्या विशेष ठरावाच्या (ब) रकमेऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजेः—

"(व) (१) कोर्टाच्या ज्या अमलदारास दिवाणी काम चालविण्याच्या रीती-विषयींच्या कायद्याचें कलम ४९६ याच्या शेवटच्या पारिग्राफाअन्वयें नेमलें असेल तो अमलदार,

(२) ज्या सरकारी अमलदारास, सन १८४१ च्या १९ व्या आक्टाच्या ९ व्या कलमअन्वयें, मिळकतीचें संरक्षण करण्यास नेमलें असेल, किंवा सन १८९८ च्या ३९ व्या आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें एकाद्या वेड्या [मनुष्या]च्या मालमिळकतीचा व्यवस्थापक नेमला असेल, किंवा सन १८९० चा पालनकरणारे व वार्ड यांबाबद आक्ट याअन्वयें कोर्टानें त्याच्या हुद्याच्या नात्यानें, एकाद्या अल्पवयी मनुष्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा, अगर त्या दोहींचा, पालनकरणारा ह्मणून नेमिलें असेल किंवा ठरविलें असेल, तो अमलदार,

अशा नेमणुकीच्या किंवा ठरावाच्या सबबेनें सदहू प्रकारच्या दाव्याचा पक्षकार आहे या कारणानें."

आलीजा धि रैट ऑनरेबल धि गव्हर्नर इन् कौन्सिल
यांच्या हुकुमावरून,

(सही) एम्. एच्. डब्ल्यू. हेवर्ड,
मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या
कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.